जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सांगली

पत्ता - सांगली मिरज रोड विजयनगर सांगली फोन - 0233-2600363, Email - dcbranchsangli@gmail.co

क्रं. गृह-1/कार्या-6/एमएजी/आरआर- 518/18 दि. 26/03/2018

अ धि सु च ना

1. संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कडील क्र. विसअने/129/2299/2017 दिनांक 16-12-2017अन्वये महाराष्ट्र शासन निर्णय क्र.डीपीपी-2012/प्रक्र10/पोल-10 दिनांक 12-5-2017मध्ये नमुद केले प्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 च कलम 25(3) नुसार खालील प्रमाणे विशेष सहा सरकारी अभियोक्ता या पदासाठी पात्र उमेदवराकडुन विहीत नमुन्यात अर्ज मागविले आहेत.
2. सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता यांनी सुचीत केले नुसार 18 विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता अवश्यकता असुन भविष्यामध्ये न्यायाधिशांच्या संख्येमध्ये होणारी वाढ विचारात घेता प्रतिक्षाधिन यादीसाठी 7 उमेदवार असे एकुण 25 पदासाठी अर्ज मागविणेत येत आहे.
3. या नियुक्त्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येतील व सदर नियुक्त्या न्यायालयातील फौजदारी प्रकरणे चालविणे साठी फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 च्या कलम 25(3), मधील तरतुदीच्या अधीन असतील. सदर पदावर नियुक्तीसाठी पात्र उमेदवाराकडुन अर्ज मागविणेत येत आहे. या नियुक्त्या पुर्वोक्त नियामधील तरतुदींच्या अधीन राहुन केाणत्याही वेळी, कोणतीही पुर्वसुचना न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार जिल्हादंडाधिकारी सांगली यांचेकडे राखुन ठेवीत आहे.
4. **<u>नियुक्तीसाठी पात्रतेचे निकषः-</u>**

1. अर्जदार भारताचा नागरीक असावा.
2. अर्जदार कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाचा विधी पदवीधर असावा आणि त्यांने बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांचेकडे वकील म्हणुन नोंदणी केलेली असावी.
3. जाहिरातीच्या दिनांकास अर्जदारास वकीली व्यवसायाचा किमान 5 वर्षाचा अनुभव असणे अवश्यक आहे.
5. उपरोक्त पदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी त्यांचे अर्ज या सुचनेसोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात भरुन ते जिल्हादंडाधिकारी सांगली यांच्या नावने अग्रेषीत करावेत व परिपर्णु भरलेले विहीत नमुन्यातील अर्ज जिल्हादंडाधिकारी सांगली मिरज रोड विजयनगर सांगली यांचे कार्यालयात दाखल करावेत.
6. अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक 5/4/2018 असा असून या दिनांकापर्यंत कार्यालयीन वेळेत प्राप्त झालेले अर्ज स्विकारण्यात येतील. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या त्याचप्रमाणे अपुर्ण व अस्पष्ट अर्जांचा विचार केला जाणार नाही.
7. नियुक्तीसाठी पात्रतेच्या निकषांच्या अनुषंगाने अर्जदाराने आपल्या अर्जासोबत आवश्यक त्या कागदात्रांच्या/ प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे.
8. सदर नियुक्त्या उमेदवारांच्या मुलाखती घेऊन केल्या जाणार असल्याने अर्जांच्या छाननीअंती मुलाखतीसाठी पात्र उमेदावरांची संख्या मर्यादीत करण्याचा अधिकार जिल्हादंडाधिकारी सांगली हे राखुन ठेवीत आहेत.
9. नियुक्तीसाठी कोणत्याही उमेदवानाने कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास उमेदवारास अपात्र ठरविले जाईल.

पात्र असलेल्या वकीलांकडून सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात दोन प्रतीत अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरचे अर्ज हे जिल्हादंडाधिकारी सांगली यांचे कार्यालयात **दि - 5/04/2018 पर्यत** सादर करावे. त्यानंतर येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

टिपः- विहित नमुन्यातील अर्जाचा नमुना व अधिसुचना जिल्हा बार असोसिएशन सांगली , जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत आलेली आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांचेwww.sangli.nic.in या सांकतस्थळावर सविस्तर मराठी भाषेमध्ये नोटीस व अर्जाचे नमुने उपलब्ध करुन देणेत आलेले आहेत.

जिल्हादंडाधिकारी सांगली

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सांगली

पत्ता - सांगली मिरज रोड विजयनगर सांगली फोन - 0233-2600363, Email - dcbranchsangli@gmail.co

---

क्रं. गृह-1/कार्या-6/एमएजी/आरआर- 518/18 दि. 26/03/2018

शुध्दीपत्रक अ धि सु च ना

संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कडील क्र. विसअने/129/2299/2017 दिनांक 16-12-2015 अन्वये महाराष्ट्र शासन निर्णय क्र.डीपीपी-2012/प्रक्र10/पोल-10 दिनांक 12-5-2017मध्ये नमुद केले प्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 च कलम 25(3) नुसार खालील प्रमाणे विशेष सहा सरकारी अभियोक्ता या पदासाठी पात्र उमेदवराकडुन विहीत नमुन्यात अर्ज मागविले बाबत दिनांक 26-3-2017 रोजीच्या दैनिक सकाळ या वृत्तपत्रामध्ये जाहीरात देणेत आलेले आहे. सदर जाहिरातीमध्ये वयोमर्यादा प्रसिध्द करणेत आलेली नाही. तरी दिनांक 26-3-2018 रोजीच्या अधिसुचना मधील 4(3) नंतर -

4.(4) वयोमर्यादाः- 38 वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारासाठी 5 वर्षाने शिथिलक्षम आहे. असे वाचावे.

जिल्हादंडाधिकारी सांगली

प्रत :- ① अध्यक्ष दि सांगली जिल्हा बार असोसीएशन सांगली
② मा. जिल्हा सरकारी वकील- सांगली